N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पुणे शहर **P.S.(ठाणे):** चतु:श्रृंगी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0170 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/02/2024 14:57

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 06/12/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 24/01/2024
**Time From (वेळेपासून):** 16:40 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 14/02/2024 **Time (वेळ):** 14:15 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/02/2024 14:43 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 4 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** महावितरण कार्यालय,शिवाजी हौसिंग सोसायटी,सेनापती बापट रोड, पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री चेतन बद्रू बोराडे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1984
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर क्र1017/108 गोखलेनगर, पुणे,चतु:श्रृंगी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर क्र1017/108 गोखलेनगर, पुणे,चतु:श्रृंगी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9595036263

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री योगेश पाटील | | | 1. शिवाजी हौसिंग सोसायटी,, सेनापती बापट रोड, पुणे ,चतु:श्रृंगी ,पुणे शहर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
दिनांक :- 14/02/2024

मी श्री चेतन बंडू बोराडे, वय 40 वर्षे, रा.घर क्र.1017/108 गोखलेनगर, पुणे-411016 मोबा.क्रं. 9595036263

मी वरील प्रमाणे असुन वर नमुद पत्यावर कुटुंबासह राहण्यास आहे, माझा बांधकाम व्यवसाय आहे. मी दि. 06/12/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे येथे श्री. नितीन जाधव, पोलीस उपअधिक्षक,लाप्रवि,पुणे यांना समक्ष भेटुन माझी लाचेच्या अनुषंगाने तक्रार असल्याबाबत सांगितले. त्यांनी माझी तक्रार ऐकुन घेवुन श्रीमती विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाप्रवि पुणे यांना बोलावुन घेवुन माझी त्यांचेशी ओळख करुन देवुन माझ्या तक्रारी संदर्भात त्यांना सांगितले व त्यांना पुढील कारवाई करण्यास सांगितले.
त्यानंतर श्रीमती विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाप्रवि पुणे यांचेसोबत मी त्यांच्या कक्षात गेलो. तेथे त्यांना माझी लाचेच्या मागणीचे अनुषंगाने तक्रार कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार लिहुन दिली ती पुढीलप्रमाणे "मी गोखलेनगर येथील रहिवाशी असून, गेले दहा वर्षापासून मी बांधकाम व्यवसाय करीत आहे. मी श्री लोंढे परिवार यांचे नवीन वास्तु नुतनीकरण करुन दिले असून, त्या ठिकाणी असलेला वीज पुरवठा मीटर कमी पडत असल्याने त्या ठिकाणी नवीन चार वीज मीटर कनेक्शन घेणेकरिता शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे महावितरण कार्यालय या ठिकाणी गेलो असता तेथे माझी ओळख महावितरण कर्मचारी योगेश पाटील, तंत्रज्ञ यांचेशी झाली, त्यांनी मला नवीन वीज मीटर जोडणीसाठी प्रत्येकी एक मीटरचे नवीन वीज कनेक्शनसाठी 6,000/-रुपये प्रमाणे एकुण चार मीटरसाठी रु.24,000/- ची मागणी करीत आहेत. तसेच नवीन वीज मीटर कनेक्शनसाठी व स्थळ पाहणी अहवालामध्ये कोणतीही त्रुटी न काढता सही करणेसाठी श्री. योगेश पाटील हे माझेकडे लाच मागणी करीत असलेबाबत व ते ज्या पैशांची मागणी करीत आहेत ती रक्कम लाच रक्कम असल्याने सदरची लाच रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने आपल्या कार्यालयामार्फत योग्य ती कारवाई करण्यात यावी ही विनंती." अशा स्वरुपाची लेखी तक्रार माझे हस्ताक्षरात लिहुन दिली.
दि.06/12/2023 रोजी श्रीमती विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक,लाप्रवि पुणे यांनी नगर भूमापन अधिकारी, पिंपरी चिंचवड कडील दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले. त्यानंतर काय कारवाई करायची याबाबत माहिती दिली. माझ्या तक्रारीची पडताळणी करणेसाठी मला व्हाईस रेकॉर्डरची माहिती देऊन व्हाईस रेकॉर्डर माझे अंगातील बनियनला बाहेरुन दिसणार नाही अशा रितीने सेफ्टी पीनने लावला. माझे सोबत शासकीय पंच श्री.रोहिदास लुमाजी राऊते यांना दिलेवर आम्ही दोघे 17.00 वाजता श्री. योगेश पाटील, तंत्रज्ञ, यांचेकडे महावितरण कार्यालय, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे कार्यालय येथे पाठविले. तेथे गेल्यावर श्री.योगेश पाटील साहेब न दिसल्याने मी त्यांना माझे मोबाईल वरुन त्यांचे मोबाईल फोनवर कॉल करुन विचारले असता त्यांनी मला जवळच असलेल्या श्रीकांत बिल्डींगचे पुढे येण्यास सांगितले. तेथे आम्ही गेल्यावर लोकसेवक श्री योगेश पाटील हे मला भेटले, आमचेमध्ये नवीन मिटर कनेक्शनचे संदर्भाने चर्चा झाली, त्यावेळी लोकसेवक श्री.पाटील म्हणाले की, पेमेंटच बोलतो मी, तुम्हाला बोललोना, सहा हजार माझ्यापेक्षा कमी मध्ये कोणी करणार असेल तर त्याचेकडून करुन घ्या, त्यावर मी म्हणलो की, मग.. एका मिटरला किती त्यावर श्री योगेश पाटील म्हणाले सहा हजार रुपये

-2-
त्यावर मी म्हणालो -आता किती झाले मिटरचे आपले बघा, सहा चौके चौवीस, चौवीस हजार, मी पोराला पाठवतो त्याचेकडे पैसे दया असे म्हणून चौवीस हजार रुपयांची मागणी माझ्याकडे केली. त्यानंतर मी त्यांना म्हणालो ठीक आहे मी फोन करतो. त्यानतर आम्ही सापळा पथक जेथे थांबले होते त्या ठिकाणी परत आलो. तेथे

माझेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद करुन मला तुम्ही गेल्यापासुन काय काय झाले याबाबत विचारले असता मी श्रीमती चव्हाण यांना वरीलप्रमाणे सांगुन श्री.योगेश पाटील यांनी माझेकडे चोवीस हजार रुपयांची मागणी केल्याचे सांगितले. त्यावेळी श्रीमती चव्हाण यांनी मला श्री. पाटील यांनी मागणी केलेली रक्कम तुम्हाला 24,000/- रुपये आता हजर करावे लागतील असे सांगितले. मी त्यांना लाप्रवि कार्यालयात येण्यास सांगितले. दुसरे दिवशी दि. 07/12/2023 रोजी श्रीमती चव्हाण यांनी माझे मोबाईलवर फोन करुन अॉफीसला येण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना येतो म्हणुन सांगितले पण गेलो नाही. कारण मला माझे वैयक्तिक काम असल्याने मी दि. 08/12/2023 रोजी माझे मुळ गावी गेलो व दि. 23/01/2024 रोजी परत पुण्यात आलो.

दरम्यानचे काळात मला श्रीमती विद्युलता चव्हाण, पोलीस निरीक्षक, लाप्रवि पुणे यांनी लाप्रवि कार्यालय येथे हजर राहणेबाबत वारंवार त्यांचे वैयक्तीक फोनवरुन व लाप्रविचे लॅन्डलाईन फोनवरुन कॉल येत होते. मी त्यांना लाप्रवि कार्यालय येथे येणार असलेबाबत प्रत्येक वेळी सांगत होतो. तसेच माझे वर नमुद पत्त्यावर आपले कार्यालयाकडून हजर रहाणेबाबतचे दोन समजपत्र मला प्राप्त झालेले आहे.

मी दि. 23/01/2024 रोजी लाप्रवि कार्यालयात समक्ष हजर होऊन श्रीमती विद्युलता चव्हाण यांना सांगितले की, दि.08/12/2023 ते दि.23/01/2024 पर्यंत माझे मुळ गावी येथे माझे वैयक्तिक कामाकरीता गेलो होतो. दि.24/01/2024 रोजी लोकसेवक श्री.योगेश पाटील यांनी माझेकडे मागणी केलेली रक्कम देण्याकरीता सापळा कारवाई करण्याचे ठरले. सापळा कारवाई करीता लागणारी रक्कम 10,000/- रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 20 नोटा मी पंचासमक्ष हजर केले. त्यानंतर आम्हांला अॅन्थ्रॅासिन पावडर व अॅल्ट्राव्हायोलेट दिव्याचे गुणधर्म सांगुन प्रात्यक्षिक दाखविले. नंतर मी दिलेल्या नोटा एका कर्मचारी यांनी कागदावर ठेवुन नोटांना अॅन्थ्रॅासिन पावडर लावुन नोटा माझे अंगातील शर्टचे खिशात ठेवल्या. त्यानंतर मी पंच श्री.रोहीदास रावते असे श्री.योगेश पाटील यांनी मागितलेली रक्कम देण्याकरीता महावितरण कार्यालय, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे येथे भेटण्यासाठी गेलो, ती वेळ सुमारे 13.29 वा.ची होती. सापळा कारवाईत लोकसेवक श्री.योगेश पाटील यांचेशी बोलणे करताना त्यांनी मला "सही दिली ना तुम्हाला आता, तुम्ही डायरेक्ट कोटेशन काढा ना बाईकडे जावुन आता, माझे काहिच काम नाही डायरेक्ट बाईकडे जा अण कोटेशन काढा लगेच, लगेच कोटेशन भरुन टाका, लगेच येवुन जाईल मिटर येवढ काय आहे" असे म्हणुन लाच रक्कम घेण्यास नकार देऊन पैसे घेतले नाहीत.

-3-

दि.08/12/2023 ते दि.23/01/2024 रोजी पर्यंत ब-याच दिवसांचा कालावधी गेल्यामुळे लोकसेवक श्री योगेश पाटील, तंत्रज्ञ, महावितरण कार्यालय, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे यांनी माझेकडून लाच रक्कमेचा स्विकार केला नाही असे मला वाटते.

तदनंतर दि.25/01/2024 ते दि.07/02/2024 रोजी पर्यंत मी पर्यटनासाठी बाहेरगावी असल्यामुळे लाप्रवि कार्यालय येथे जबाबासाठी हजर झालेलो नव्हतो. तरी दि.06/12/2023 रोजीचे नोंदविलेल्या लाचेच्या तक्रारीचे अनुषंगाने मला नवीन वीज मीटर कनेक्शनसाठी व स्थळ पाहणी अहवालामध्ये कोणतीही त्रुटी न काढता सही करणेसाठी लोकसेवक श्री योगेश पाटील, तंत्रज्ञ, महावितरण कार्यालय, शिवाजी हौसिंग सोसायटी, सेनापती बापट रोड, पुणे यानी दि.06/12/2023 रोजी माझेकडे 24 हजार रुपयांची लाचेची मागणी केली म्हणुन माझी कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद माझे सांगणेप्रमाणे टंकलिखित करण्यात आली असुन त्यांची प्रिंट काढुन ती मी वाचुन पाहीली असुन बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Ankush Bhalchandra Chintaman
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): DGPABCM7801
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Borade

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Balaji Angadrao Pan
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 14601000450BAPM810

FIR प्रत मिळाली

Borade
चेतन लहू बोराडे